Lalita Gandbhir
4200 North Ocean Dr.
1501 - 2
Singer Island, FL 33404
U.S.A.
lalitagandbhir@hotmail.com

# सैतान अमर असतो

जयंता नाईकची आणि माझी अगदी लहानपणापासून ओळख होती. आम्ही दोघ एकाच वर्गात होतो. लहानपणी जरी तो माझा खास मित्र नसला तरी तो मला जवळचा वाटायचा. कदाचित आमची घरे जवळ असल्यामुळे असेल. आमच्या आईवडिलांची मात्र अगदी घनिष्ठ मैत्री होती.

तसा आम्हा दोघा कुटुंबांच्या आर्थिक परिस्थितीत बराच फरक होता. त्याच्या वडिलांचा प्रचंड वाडा होता. त्या वाड्यात ते एकटे आपले आईवडिल, पत्नी व एकुलत्या एका मुलासह राहात असत.

त्यांच्या वाड्यात सगळे सण थाटाने साजरे होत. त्यांच्या वाड्याच्या मधल्या चौकात उभारलेल्या मंडपात भवती आरास मांडून घेऊन गणपती दिमाखात दहा दिवस राहायला येई. सकाळसंध्याकाळ पूजा, आरती, नैवेद्य चालत असे. सगळी गल्ली ह्या गणपतीला स्वतःहूनच उपस्थित राही. एका रात्री गल्लीतली हौशी मंडळी करमणुकीचे कार्यक्रम सादर करीत. इतर रात्री आमंत्रितांची गाणी, भजन, कीर्तन असे कार्यक्रम होत.

दिवाळीत लक्ष्मीपूजनाला त्यांच्या घरी सगळ्यांना आमंत्रण असे. बायकांना हळदीकुंकू व सगळ्यांना चहाफराळ दिला जाई. आम्ही मुलं तर सबंध दिवस त्यांच्या वाड्यातच धुडगूस घालत असू. जयंताकडे कधीही न संपणार फटाक्यांचा साठा असे. तो मुक्त हस्ते फटाके सर्वांना वाटत असे.

वर्षातल्या इतर महिन्यातूनही एकदा तरी जयंताच्या वाड्यात काही तरी उत्सव साजरा होई. दसरा, संक्रांत, होळी, रंगपंचमी, पाडवा हे तर मलाच आठवतात. पण मला न आठवणाऱ्या अनेक सणांची यादी माझ्या आईच्या स्मृतिकोशात आहे. आई सणांचे व उत्सवांचे वर्णन पुन्हा पुन्हा करतेच. वरती नाईकांच्या दानशूरतेचेही गोडवे गाते. त्यांच्यासारखी दानशूर माणसं तिच्या आयुष्यात आलीच नाहीत म्हणे.

जयंता व मी तेरा वर्षांचे असताना जयंताच्या धाकट्या बहिणीचा राजश्रीचा जन्म झाला. तेव्हा तर नाईकांच्या दानधर्माला उधाणच आलं होत. जयंताच्या ह्या नव्या बहिणीच्या बारशानिमित्त झालेला समारंभ तर माझ्याही लक्षात आहे. सात दिवस जेवणं, भजनं, कीर्तन व गाणी चालली होती.

राजश्रीच्या जन्मानंतर माझ्या वडिलांनी नोकरी बदलली. आम्ही दुसऱ्या गावी राहायला गेलो आणि माझा व जयंताचा संबंध तुटल्यातच जमा झाला. जयंता, राजश्री, नाईकांची श्रीमंती, त्यांची दानशूरता यांचा मला विसर पडला. फक्त मधून मधून आई व आजी यांच्या गप्पागोष्टीतून काही बातम्या उडत कानावर येत. त्यातल्या काही ठळक बातम्या आजवर लक्षात राहिल्या आहेत.

राजश्रीच्या जन्मांतर भाग्यश्री व शंतनू ह्या दोन अपत्यांचा जन्म झाला. जयंता मॅट्रिक पास झाल्यावर अकस्मात हृदयविकाराचा झटका येऊन  जयंताचे वडिल व वर्षाने त्याचे आजोबा मृत्यू पावले. आईचं म्हणणं असं की जयंताचे आजोबा पुत्राच्या निधनाच्या दुःखाने झुरून स्वर्गलोकी गेले. त्यांच्या वाड्यात आता विधवा सासू व सून, १७ वर्षांचा जयंता, व राजश्री, भाग्यश्री, शंतनु ही चिल्लीपिल्ली राहात होती.

माझे वडील तसे फारसे या बायकांच्या गप्पागोष्टीत भाग घेत नसत पण ते एकदा एवढच म्हणाले, “नाईकांच्याकडे गडगंज संपत्ती आहे. सांभाळून राहतील तर पिढ्यानपिढ्या पुरेल.”

मॅट्रिक नंतर मी दोन वर्षे कोल्हापूरला कॉलेजात गेलो. त्या दरम्यान वडिलांनी परत आमचं बिऱ्हाड पुण्याला हलवायचं ठरवलं. मी पुण्याला फर्ग्युसन कॉलेजात तिसऱ्या वर्षाला बी.ए. ला नाव घातले.

माझ्या वडिलांनी डेक्कन जिमखान्याला माझ्या कॉलेजजवळ जागा भाड्याने घेतली व राहण्यासाठी स्वतःचा बंगला बांधायचा असं ठरवून एक प्लॉट विकत घेतला. आम्ही कोल्हापुरचे बस्तान आवरून पुण्याला जायला निघालो. गाडीत वडिल आईला म्हणाले, “तुला एक बातमी सांगायचीय. मी प्लॉट घेतला तो नाईकांचा होता. त्यांचे डेक्कनला चार प्लॉट होते. त्यातला एक त्यांनी आपल्याला विकला. आपल्या शेजारीच  ते बंगला बांधणार आहेत म्हणे.”

“काय ? ते गावातला वाडा सोडणार ?” आईला आश्चर्याचा धक्का बसला.

“बंगला बांधला म्हणजे वाडा सोडायलाच हवा का ?” वडिलांनी विचारले.

ह्या विषयावर पुढे जास्त बोलणं झाले नाही.

कॉलेजात मला जयंता भेटला.

ताबडतोब त्याने मला घरी जेवायला बोलावलं.

पुढच्या वर्षात मी अनेकदा जयंताकडे गेलो. घरात त्याचे वडील व आजोबा नव्हते. एवढाच फरक सोडला तर बाकी सर्व पूर्वीप्रमाणेच चाललं होत हे मला जाणवलं. पूजाअर्चा एकटा जयंताच करीत होता. आई व आजी सर्व व्यवहार सांभाळत होत्या.

“नाईकांच्या घरात कर्ता पुरुष नाही हे जाणवतही नाही. सगळ पूर्वीसारखं चाललंय हो. हळदीकुंकू होत नाही एवढंच. पण पूजाअर्चा, उत्सव चालूच आहे.” आजी एकदा म्हणाली.

“नाईकांच्या आजी म्हणत होत्या सरदार घराणं आमच ! परंपरा सोडून कसं चालेल?” आईने सांगितलं.

“सरदारांना पण पोट असतं, आणि परंपरा चालवायला पैशाचे खतपाणी लागतं.”वडिल म्हणाले.

“ते बाकी खरं. दोन मुली पदरात आहेत. सांभाळून खर्च करायला हवा,” आई म्हणाली.

“जयंता माझ्या मित्राचा मुलगा आहे. एकदा चार गोष्टी बोलणार आहे त्याच्याशी.” वडील उद्गारले.

मी वडिलांकडे आश्चर्याने बघितलं, माझे वडील दुसऱ्याच्या भानगडीत कधीच पडत नसत. मग मला आठवलं, जयंताच्या वडिलांशी माझ्या वडिलांची घनिष्ठ मैत्री होती. आम्ही पुण्याला राहात असताना रोज सकाळी उठून पार्वतीला जाण्याचा त्यांचा नियम होता.

आता माझीही जयंताशी खूप मैत्री झाली होती. मी त्याच्या कानावर आमच्या घरातली चर्चा घातली. तो माझ्याशी काहीच बोलला नाही.

वडिल जयंताशी बोलले का नाहीत हे मला माहीत नाही. पण जयंताने हळूहळू घरातल्या व्यवहारात डोकं घालण्यास सुरुवात केली होती हे माझ्या लक्षात आलं. त्याच्याबरोबर त्याने मला अनेकदा बागायतीची पाहाणी करण्यासाठी बोलावलेलं मला आठवतं. एकदा तो त्यांचा डेक्कन जिमखान्यावरचा आणखी एक

प्लॉट विकावा का नाही याची चर्चा करण्यासाठी माझ्या वडिलांना येऊन भेटला. तसंच आमचा बंगला बांधताना काय खर्च आला याचीही त्याने चौकशी केली.

पुढे मी मुंबईला कॉलेजात जायचं ठरवलं. तिथून पुढे लष्करात दाखल झालो. आणि जयंताचा व माझा संबंध तुटल्यातच जमा झाला.

माझ्या लग्नासाठी मी पुण्याला परतलो तेव्हा जयंता माझ्या लग्नाला राजश्री व भाग्यश्री यांना घेऊन आला होता. त्याचं लग्न अजून झालं नव्हतं.

"तू सर्वांची लग्नं जमविण्याचे उद्योग करतेस. मग जयंतावर का आपली कृपादृष्टी वळवत नाहीस ?" असं मी आईला विचारलं. तेव्हा तिने माझ्याकडे आश्चर्याने बघितलं.

"तुला ठाऊक नाही वाटतं ? जयंताने आपल्या आजोबांना ते मृत्यूशय्येवर असताना वचनं दिली आहेत."

"खरच ! जयंता काय पौराणिक काळात राहतोय ?"

माझ्या शेऱ्याकडे दुर्लक्ष करून आई बोलत राहिली.

"एक असं की, शंतनूचं लग्न करून त्याचा संसार नीट लावून देईन व दुसरं असं की, दोन्ही बहिणींची लग्न होईपर्यंत आपण स्वतः लग्न करणार नाही."

"महामूर्ख आहे जयंता." मी म्हटलं.

"एवढच नव्हे तर त्याने स्वतःचे लग्नही ठरवलंय. जोश्यांच्या वंदनेशी. ती मास्तरणीची नोकरी करतेय. जयंताच्या आईने, आजीने, वंदनेच्या आईवडिलांनी, तुझ्या बाबांही जयंताला पुन्हा पुन्हा सांगून बघितलं. पण व्यर्थ, तो आपल्या भीष्मप्रतिज्ञेपासून ढळायला तयार नाही."

"खरं सांगतेस ?" मी विचारलं.

"मग काय खोट सांगतेय? अरे, तुझ्या बाबांनी सुचवलं की, मुलांच्या नावावर पैसे ठेव व ट्रस्टी नेम म्हणजे लग्न झाल्यावर तुला दुर्बुद्धी झालीच तरी बहिणी सुरक्षित राहतील. पण तो ऐकत नाही. वंदना त्यांच्या शेजारच्या वाड्यातच राहाते. लहानपणापासून नाइकांकडे तिचे जाणेयेणे आहे. पण

जयंताच्या हट्टाने मुलगी अविवाहीत राहिली आहे. वंदनाची आई, “काय हो माझी मुलगी वेड्यासारखा हा प्रेमविवाह ठरवून बसलीय” म्हणून रडत होती माझ्याकडे.”

जोशांची वंदना?

मी स्मृतीला ताण दिला.

कुरळ्या केसांची, दोन वेण्यावली, फ्रॉकातली, शाळकरी वंदना माझ्या डोळ्यासमोर अस्पष्ट तरळून गेली. जयंता पेक्षा व माझ्यापेक्षा चार पाच वर्षांनी ती लहान होती.

मी एकटाच जयंताला भेटायला गेलो.

“कसला वेडेपणा करतोयस ?” मी जयंताच्या पाठीवर थाप मारून हसत विचारलं, “अरे, तुझ्या आजोबांची तुझं लग्न होऊ नये अशी इच्छा थोडीच होती? मुलींच व शंतनूचं व्यवस्थित व्हावं असं त्यांना वाटत होतं. तू लग्न करूनही ते कर्तव्य पार पाडू शकतोस.”

“मी आजोबांना शब्द दिलाय.” जयंता गंभीरपणे म्हणाला.

“आणि वंदना? तुझ्याबरोबर तिचं तारुण्य फुकट चाललंय त्याच काय?”

“मी कुठे तिला अडवतोय ? तिने खुशाल हव तर दुसऱ्याशी लग्न करावं. पण माझ्याशी लग्न करण्याची इच्छा असल्यास तिला थांबावच लागेल.”

मी जयंताच्या डोळ्यातला निश्चय टिपला. त्याचा निर्धार बदलणं अशक्य होतं हे मला कळून चुकलं.

मामी, जयंताची आई चहा घेऊन आल्या.

“जयंताच्या आजी पणतू बघायला तळमळत आहेत. अगदी बिछान्याला खिळल्या आहेत. कधी कधी भ्रम होतो त्यांना. मामंजीनी जयंताकडून असं वचन घेतल्याबद्दल शिव्यांची लाखोली वाहतात सासूबाई. कुणी नवं दांपत्य जोड्याने नमस्कार करायला लागलं तर जयंताच लग्न करून आला आहे असं वाटत त्यांना.” त्या म्हणाला.

मी वाड्यातून बाहेर पडताना दरवाजात एक तरुणी भेटली. मला बघून ती थबकली. आम्ही दोघांनीही एकमेकांना न्याहाळलं.

“वंदना ------?” मी विचारलं.

“हो”, ती हसली.” तू कोण ? बंड्या...... म्हणजे उदय कारे ?”

“हो, मी दिक्षितांचा उदय.”

वंदना फारच छान दिसत होती. तिच्या अंगाअंगातून लोभस तारुण्य सळसळत होतं.

“अशी ही साक्षात मेनका समोर असताना हा महामूर्ख जयंता वचन एके वचन करीत बसला आहे. कशासाठी एवढा हा संयम ? केवढा त्याग !”

मी वंदनाला म्हटलं, “वंदना, तुझ्या भावी नवऱ्याचं लवकर लग्न करण्यासाठी मन वळवण्याचा प्रयत्न केला मी आत्ता, अयशस्वी झालो. तुझ्याकडे बघून प्रेम आंधळं नसून महामूर्ख असतं अशी खात्री पटली आहे.”

वंदना हसली आणि म्हणाली, “माझी वाट बघायला तयारी आहे. आपण फक्त पती किंवा पत्नीबरोबर विवाह करत नसतो. त्यांच्या समस्यांशीही आपला विवाह होतो”

वंदनाने विषय बदलला. “घेऊन ये ना एकदा बायकोला, नवी नवरी आहे तोपर्यंत बघून घ्यायची आहे.”

मी घरी परतलो. उगाच उदास उदास वाटू लागलं.

“भेटला का जयंता ?” आईने विचारलं.

“भेटला” मी सांगितलं.

“तुझ्या उपदेशाचा काही परिणाम झाला का ?”

मी न सांगता आईने माझ्या जयंताला दिलेल्या भेटीमागचा हेतू ओळखला होता.

“नाही.” मी म्हटलं.

“जयंताने खर्चातही हात आवरता घ्यायला हवा असं हे म्हणत होते. अजूनी त्यांच्या वाड्यात सगळं पूर्वीसारखं चाललंय. “महागाई खूप वाढलीय पण जयंता परंपरा म्हणून आजीच्या मनासारखं सगळं करतो. शिवाय तो बंगला बांधला ना आपल्या घरामागचा, त्यात त्याला कॉंट्रॅक्टरने फसवलं म्हणे.”

“बंगल्यात कोण राहातं ?”मी विचारलं.

“कुणी नाही. मधून मधून सगळे येतात. दोन दिवस राहून जातात. वाड्यातली पूजाअर्चा व्हावीच लागते. दोनच दिवस पुजाऱ्यांवर टाकून येता येतं त्यांना. तिसऱ्या दिवशी इतर सगळे राहिले तरी जयंता परत जातो.”

“बंगला बांधलाच कशाला ?” मी विचारलं.

“जयंताच्या वडिलांची इच्छा होती म्हणे. त्याच हेतूने त्यांनी डेक्कनला प्लॉट घेतले होते म्हणे.”

मी एक सुस्कारा टाकला. त्या संध्याकाळी पत्नीसह वंदनाला भेटून आलो. तिने माझ्या पत्नीच्या, रंजनाच्या मंगळसुत्राकडे आसुसून बघितले असा मला भास झाला.

दुसऱ्या दिवशी मी पुणे सोडले आणि आपल्या संसारात गुंतलो.

दोन वर्षांनी आईच्या पत्रातून जयंताच्या आजीला देवाज्ञा झाल्याची बातमी आली.

नंतर बऱ्याच वर्षांनी राजश्रीचं लग्न ठरल्याची वार्ता आली.

त्यानंतर आई बरीच आजारी झाली म्हणून मी पुण्याला गेलो. आईची प्रकृती सुधारू लागल्यावर मला जयंताची आठवण आली. मी जयंताला भेटायला गेलो. जाण्यापूर्वी नाईकांच्या बंगल्याकडे दृष्टिक्षेप टाकला. बंगल्याला कुलूपच होतं.

जयंताला माझ्याशी गप्पा मारायला वेळ नव्हता. तो राजश्रीच्या लग्नाच्या तयारीत गुंतलेला होता. कुणी पाहुणे येणार होते. वंदनाही तिथेच होती. कामातून वेळ काढून मला ‘नमस्कार’ म्हणून गेली. तिचं रसरसतं तारुण्य अजूनही टिकून होतं, पण त्यातली नव्हाळी गेली आहे असं मला वाटून गेलं.

जयंताने मला राजश्रीच्या लग्नाला येण्याचा फार आग्रह केला. पण माझी रजा संपल्याने मला परत जाणे भाग आहे हे मी त्याला समजावून सांगितले.

जयंताने माझी राजश्री, भाग्यश्री व शंतनूशी ओळख करून दिली. दोन्ही मुली आईसारख्याच सुंदर होत्या. शंतनू मात्र कुणाच्या वळणावर गेला होता कोण जाणे ? त्याचे एकूण रंगढंगच मला पसंत पडले नाहीत.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे भाग्यश्री मला भेटायला आली. मी बस म्हटल्यावर बसली व झपाटल्यासारखी बोलू लागली.

“तुम्ही जयंतादादाचे जुने मित्र म्हणून तुमच्याकडे आले. आई व दादा माझं लग्न ठरवण्याच्या मागे आहेत. मला लग्न करायचं नाही. निदान एवढ्यात नाही. मला मेडिकलला जायचे आहे. तुम्ही जयंतादादाला सांगून बघा. तो तुमचं ऐकेल. आई म्हणतेय, तुझा भाऊ तुमची लग्न झाल्याशिवाय स्वतःचं लग्न न करण्याचा निर्धार करून बसला आहे. मी म्हटलं, तो वेडेपणा मला ठाऊक आहे. त्याने खुशाल लग्न करू दे. मी त्याला त्याच्या वाचनातून मोकळी करीत. मला तो अधिकार आहे.”

“तू जयंताशी या विषयावर बोललीस का ?” मी भाग्यश्रीला विचारलं.

“बोलले, तो म्हणाला ठीक आहे. तू मेडिकल कॉलेजमधून पास होईपर्यंत मी थांबेन. पण आईला ते पसंत नाही.” भाग्यश्रीने सांगितले.

“मग एकच उपाय आहे. तू लग्न करून शिकायचं.” मी म्हटलं.

“ते कठीण जाईल. त्यासाठी मला लग्न झाल्यावर कॉलेजात जाण्याची परवानगी देणारा नवरा व सासर मिळायला हवं. त्यापेक्षा मला मुलं, संसार ह्या चक्रात अडकण्याआधी शिक्षण पुरं करायच आहे.” भाग्यश्री म्हणाली.

“मी जयंताला सांगून बघतो. पण मला नाही वाटत तो ऐकेल.” मी भाग्यश्रीचं समाधान व्हावं म्हणून सांगितलं.

भाग्यश्रीच्या डोळ्यात पाणी आलं. ती डोळे पुसत निघून गेली.

ती गेल्यावर आई म्हणाली. “फारच हुशार आहे हो ही मुलगी. पाचवी आली दहावीच्या परीक्षेत”

मी कपाळावर हात मारला. “तिच्या हुशारीची किंमत नाही नाईकांना. सध्या ती फक्त जयंताच्या लग्नाच्या मार्गातली धोंड आहे त्यांच्या दृष्टीने.”

जयंताशी झालेले माझे बोलणे अर्थात व्यर्थच ठरले.

“एवढा थांबलो तर आणखी पाच वर्ष” तो म्हणाला.

शेवटी भाग्यश्री मेडिकलला गेलीच.

नंतर आईच्या पत्रातून मला समजलं की एका वर्षात माझ्या व भाग्यश्रीच्या आईने महाप्रयत्न करून तिचं शिक्षण चालू ठेवण्यास परवानगी मिळेल असं स्थळ शोधलं, व भाग्यश्री बोहोल्यावर चढायला

तयार झाली. तिचं व जयंताच लग्न एकाच मंडपाखाली करण्याचा जयंताच्या आईचा विचार होता. त्यांचं मला आग्रहाचं पत्र आलं.

मी लग्नाला जाण्याच ठरवलं.

पत्नी व मुलांसह मी भाग्यश्री व जयंताच्या लग्नाआधी आठ दिवस पुण्याला पोहोचलो. घरी पोचताच आईने मला एक सनसनाटी बातमी दिली.

जेमतेम एकोणीस वर्षांच वय असलेल्या शंतनूने एका मुलीशी सर्वांच्या नकळत विवाह केला होता. तिच्या बापाला आपल्या मुलीला मुल होणार आहे याचा शोध लागला होता. त्याने ताबडतोब आपल्या मुलीला नाईकांच्या वाड्यात आणून सोडलं होतं. ही घटना होऊन दोन दिवस उलटले होते.

ही बातमी षट्कर्णी होईल याची नाईकांना अत्यंत काळजी लागली होती. फक्त आईबाबांना जयंताने ही बातमी येऊन सांगीतली होती. व मी घरातल्यासारखाच असल्याने मी येऊन पोचताच मला जयंताने वाड्यावर बोलावलं होतं.

थोडक्यात, नाईकांच्या घरात जयंताच्या लग्नाआधीच सून येऊन पोचली होती.

मी वाड्यात पोहचलो तेव्हा शंतनू एकटाच पडवीतल्या झोपाळ्यावर बसला होता.

“या .या. उदयदादा या. दादा तुमची वाटच पहातो आहे. पण आधी ह्या घरातल्या नव्या माणसाशी तुमची गाठ घालून देतो. उत्तरे...”, त्याने हाक मारली.

आतून एक उफाड्याची तरतरीत स्त्री बाहेर आली. अशा कठीण परिस्थितीतही ती फार घाबरलेली दिसत नव्हती.

“हे जयंतादादाचे खास मित्र बंडू उर्फ उदयदादा आणि ही ह्या अभिमन्यूची उत्तरा” असं म्हणत शंतनूने स्वतःच्या छातीवर हात मारून घेतला.

शंतनुची थट्टामस्करी चालू राहिली तरी उत्तरा गंभीर झाली. तिने मला वाकून नमस्कार केला व ती घरात निघून गेली.

जयंता बाहेर आला. मागोमाग मामी आल्या. त्या आता अगदी थकलेल्या वाटत होत्या.

मला बघून त्यांनी डोळ्याला पदर लावला.

जयंताने मला सर्व कथा सांगितली.

मी म्हटलं, “मला एकच उपाय दिसतोय. एकाच मांडवाखाली तीन लग्न लावून द्या. सांगा अकस्मात ठरलं.”

“लोक काय म्हणतील ? भाग्यश्रीच्या सासरच्या माणसांना काय वाटेल ?” आई म्हणाल्या.

“काय वाटायचे आहे ते वाटू दे.” जयंता म्हणाला.” थोडे दिवस लोक चर्चा करतील आणि मग विसरतील. मी आणि उदय आत्ताच जाऊन त्यांना भेटून येतो. जर त्यांनी अगदी नाहीच म्हटलं तर आमच्या लग्नाच्या दुसऱ्या दिवशी शंतनूच लग्न लावू.”

“शंतनूने अगदी दिवेच लावले असं वाटेल त्यांना.” आई म्हणाल्या.

“लावलेच आहेत त्याने दिवे.” जयंता म्हणाला. “ आता पाजळत ठेवायचं काम आपले.”

जयंता व मी भाग्यश्रीच्या सासरी गेलो. तिच्या सासऱ्यांनी सर्व हकीगत ऐकून घेतली आणि म्हणाले, “अहो, काळजी कसली करता ? होऊ द्या एका मंडपाखाली तीन लग्न.”

लग्नाच्या आदल्या दिवशी वंदना मला अगदी मावळलेली दिसली. पण लग्नाच्या दिवशी ती पुन्हा तेजाळली. सासूचे सगळे दागिने तिच्या अंगावर होते.

अभिमन्यूची उत्तरा पण चांगली दिसत होती. लग्नमंडपात तिच्याविषयी पुष्कळ कुजबूज झाली. रंजनेने मला नंतर बरच काही सांगितलं. त्यातलं ‘ती गरीबाच्या घरची आहे व वयाने शंतनूपेक्षा मोठी आहे’ एवढंच माझ्या लक्षात राहिले.

लग्नानंतर उत्तरेला सहा महिन्यात जुळे मुलगे झाले. त्यानंतर वर्षाच्या अंतराने दोन मुली झाल्या. वंदना मात्र अजून पाळणा हलण्याची वाट पहात होती. नाईकांविषयीच्या बातम्या मला आईच्या पत्रातून कळत होत्या.

पाच वर्षांनी मी पुण्याला धावती भेट दिली तेव्हा वंदना आई होण्याच्या मार्गावर असल्याची बातमी मला मिळाली. जयंताला तेव्हा मला भेटता आल नाही. पण शंतनू मात्र रस्त्यात भेटला.

“थांबा थांबा उदयदादा. एवढी काय घाई ? चला कॉफी घेऊ या.” असं म्हणत शंतनुने मला रस्त्यालगतच्या हॉटेलात खेचून नेले.

हॉटेलात नेण्याचा शंतनुचा अंतर्गत हेतू मला तिथे पोचताच समजला.

“काही झाल तरी तुम्ही माझी बाजू ऐकून घेतली पाहिजे. घरची सगळी माणसं मला दोष देतात. दादाला देवमाणूस म्हणतात. माझं कुणी ऐकतच नाही.”

माझं कुतूहल जागृत झालं. “सांग काय ते, मी ऐकतो.” मी म्हटलं.

शंतनुने कॉफी व बटाटावडा यांची ऑर्डर दिली.

“हे बघा उदयदादा, अठराव्या वर्षी मी प्रेमात पडलो. तो मूर्खपणा होताच. दमडी कमवायची अक्कल नव्हती. बरं  उत्तरा ही अशी, उफाड्याची आणि जरा जादाच. मूल माझ होतं ही माझी खात्री होती. तिला मूल होणार असताना मी तिला सोडून द्यायचं का ? एक चूक झाली हातून. ती स्विकारण्याऐवजी शेपटी खाली घालून पळ का काढायचा मी ? गुपचूप लग्न केल मी तिच्याशी, दादा व भाग्यश्रीच लग्न झाल्यावर बातमी फोडायचा माझा बेत होता. पण सासऱ्यांना पत्ता लागला आणि घोटाळा झाला. शिवाय मला वाटलं होतं, आपल्या घरी गडगंज भरलंय. नाही कमावल आपण तर कुठे बिघडलं ? बापावेगळा मुलगा म्हणून नुसते लाड झाले माझे. मी थोडीच केली होती प्रतिज्ञा जयंतादादासारखी ? मी मोकळा होतो स्वच्छेने लग्न करायला. घरचा खजिना मोकळा आहे हे कुठे ठाऊक होतं ? आणि समजणार तरी कसं ? दानधर्म, सण सगळ चालू ठेवल होत दादांनी, मला वाटलं ह्या एवढ्या घराला माझी बायको आणि मुलं पोसायला थोडच जड जाणार आहे ?”

“खजिना मोकळा म्हणजे ?” मी विचारलं.

“म्हणजे काय ? सगळ विकावं लागलय एक एक करून. आता फक्त वाडा आणि बंगला उरलाय. वाड्यात अर्धा भाग भाड्याने द्यायचा म्हणतोय दादा. नशीब हे की वंदनावहिनींनी नोकरी सोडली नाही.”

मी लगेच पुणं सोडल.

वंदनाला मुलगी झाल्याची बातमी आली.

दोन वर्षांनी आईची तार आली. “जयंताला हार्ट अॅटॅक आलाय तो सारखी तुझी आठवण काढतोय. लगेच ये.”

रजा काढून सगळी आवराआवर करून मी पुण्याला पोचेपर्यंत जयंता या जगात नव्हता. जयंताचे वडिल स्वर्गवासी झाले त्याच वयाला जयंताही स्वर्गवासी झाला होता.

जयंता गेल्याच्या दुसऱ्याच दिवशी शंतनूने आपलं वाड्यातलं बस्तान बंगल्यात हलवलं होतं, वाड्यातल्या ज्या चार खोल्या अजून नाईकांच्या ताब्यात होत्या, त्यात वंदना, मामी व वंदनाची दोन वर्षाची मुलगी अलका ह्या तिघीजणीच आता उरल्या होत्या.

जयंता गेल्याचे समजल्यावर मी फार उदास झालो.

“उगाच एवढी धडपड करून आलो.” मी वडिलांना म्हटलं.

“अरे, ज्याअर्थी तो सारखा तुझी आठवण काढत होता त्याअर्थी त्याला तुला काही सांगायचं असेल. त्याने कदाचित निरोपही ठेवला असेल तुझ्यासाठी वंदनाकडे. आलाच आहेस तेव्हा वंदनाला आणि तिच्या आईला भेटून ये.” वडिलांनी मला समजावलं.

मला नाईकांच्या वाड्यावर पाय ठेवावसा वाटत नव्हता. एके काळी दिमाखाने वैभवात लोळणारा तो वाडा तसाच स्मृतीत राहू दे, अशी मला मनोमन इच्छा होत होती. तरी मी पाय ओढत वंदनाला व जयंताच्या आईना भेटायला निघालो.

पण मी आमच्या बंगल्याबाहेर पाऊल ठेवताच “उदयदादा, उदयदादा” अशा हाका कानी आल्या.

मागे वळून बघतो तर शंतनू त्याच्या बंगल्याच्या आवारात उभा राहून हाका मारत होता.

मला शंतनूच तोंडही बघण्याची इच्छा नव्हती. तरी मी त्याच्या दिशेने वळलो.

“उदयदादा, तुमचा मित्र गेला त्यानंतर मी इथे राहायला आलो. त्याबद्दल बहुतेक तुम्हाला माझा फार राग आला असेल. तरी पाच मिनिट येऊन जा. भाग्यश्रीही आलीय.” असं म्हणत त्याने मला त्याच्या बंगल्यात खेचून नेले.

मी आत पोचताच उत्तरा व भाग्यश्री पुढे आल्या. त्यांनी मला नमस्कार केला. चार चिल्लीपिल्ली तिथेच खेळत होती. त्यांना शंतनूने बाहेर हाकललं. स्थानापत्र होताच तो भडाभडा बोलू लागला.

“जयंतादादा गेला. फारच वाईट झालं. सुख फक्त भाग्यात असून चालत नाही. त्याचा उपभोग घ्यायचा का नाही हे माणसाला ठरवावं लागतं.”

"म्हणजे ?" मी विचारलं.

"म्हणजे असं की, माणसाने प्रॅक्टीकल व्हायला पाहिजे. मरताना आजोबांनी भावनाविवश होऊन वचनं मागितली. दादांनी दिली. म्हणून त्या वचनांच पालन करायची काय जरुरी होती ? दादांच्या ह्या स्वर्थत्यागाने घरातल्या प्रत्येक व्यक्तीला त्रासच झाला."

"तो कसा ?तुला काय त्रास झाला शंतनु ?" मी विचारलं .

"सांगतो. एक एक माणसाचं सांगतो. दादांनी लग्न ठरवलं पण केलं नाही. वंदना वहिनीचं व स्वतःच तारुण्य फुकट घालवलं. सौभाग्यवती झाली नाही तों वहिनी विधवा झाली. अलका लहान वयात बापाला अंतरली. आजीने पणतू बघण्यासाठी तळमळत प्राण सोडले. आई 'नातू हवा' म्हणत कैक वर्ष दादांच्या मागे लकडा लावून दमली. भाग्यश्रीला तिची इच्छा नसताना लग्न करावं लागलं. अन् आम्हा सर्वांच्याच डोक्यावर दादांच्या स्वार्थत्यागाच ओझ बसलं."

"हे बघ शंतनु, ही सर्व बडबड तू आता करू शकतोस. पण तुमचे वडिल गेले तेव्हा तुम्ही लहान होता. मोठ्या भावाने लग्न केलं व मग लहान भावंडांचे वहिनीने हाल केले अशी कैक उदाहरणं आहेत."

"आमची आई होती. आजी होती. घरात पैसा होता. अनाथ मुलंही वाढतात. आम्हीही वाढलो असतो. शिवाय वंदना वहिनी काय आमचे हाल करणार होती ? ती घरातल्यासारखीच होती."

मी निरुत्तर झालो.

"उदयदादा, तुम्ही म्हणाल, दादा जाताच दुसऱ्या दिवशी तू बंगल्यात राहायला का आलास ? तर तेही सांगतो. पूर्वीच्या परंपरा चालू ठेवायच्या ह्या आजीच्या हट्टापायी दादांनी दानधर्म, सण सगळं व्यवस्थित चालू ठेवलं. आमच्या संपत्तीला ओहोटी लागली. उरलेलं होतं ते सगळं राजश्री व भाग्यश्रीच्या लग्नात खर्च झालं. आता सांगा परंपरा म्हणून, आजीची इच्छा म्हणून दादांनी आम्हाला कफल्लक केलं. त्याच काय ? मलाही आपल्या सांपत्तिक परिस्थिती विषयी अंधारात ठेवलं. मी धड शिकलो नाही. मला साधी कारकूनाची नोकरी आहे. चार मुलं पदरात आहेत. तेव्हा मी हा बंगला दादा जाताच पदरी पाडून घेतला. नाईकांच्या इस्टेटीच्या तेवढ्या तुकड्यावर माझा हक्क आहे."

"समजलं. पण दादा गेल्याच्या दुसऱ्या दिवशी इथे हलण्याचं काय कारण होत ?"

“कारण राजश्रीचा नवरा इस्टेटीची वाटणी करा म्हणणारा होता. दादा जाण्यापूर्वीच तो असे काही बोलत होता. ह्या बंगल्यात हिस्सा मागत होता. मुलींचाही बापाच्या इस्टेटीत हिस्सा असतो असं तो म्हणतो. त्यांचा हिस्सा त्यांना राजश्रीच्या लग्नातच दिलाय. मी इथे राहायला आल्यावर त्याला काही करता येणं शक्य नाही. जर आमची दादांच्या तावडीतून उरलेली इस्टेट आम्हाला टिकवायची असेल तर वहिनीनी वाड्यात राहाणं व मी बंगल्यात हा एकच मार्ग मला दिसत होता. अर्थात आई माझ्या वेगळे राहण्याला कधीच संमती देणार नाही. पण त्याला माझा इलाज नाही. मला दादांसारखे भावनाविवश होऊन उरलीसुरली इस्टेट गमवायची नाही.”

“वंदनाचं आणि अलकेच कसं होणार ?”

“वंदनावहिनीनी एक शहाणपणा केला. त्यांनी नोकरी सोडली नाही. शिवाय त्यांना आईने स्वतः चे व आजीचे दागिने दिलेत. त्यांच्याकडे नोकरी न करता राहण्याइतके पैसे दागिन्यांच्या रुपात आहेत याची मी तुम्हाला हमी देतो.”

मी हताश झालो.

जयंताची कर्तव्यनिष्ठुरता योग्य का शंतनूचा व्यवहार योग्य हेच मला कळेना.

शंतनूकडे चहा घेऊन मी घरी परतलो. वंदनाकडे जाण्याचा बेत संध्याकाळवर ढकलला.

संध्याकाळी मी वंदनाला भेटायला गेलो.

दारात पाऊल टाकताच वाड्याच्या मधल्या चौकाच्या उजव्या व डाव्या बाजूच्या बिऱ्हाडांचा कलकलाट कानावर आला. वाड्यातल्या पडवीमधल्या झोपाळ्यावर चार मुलं खेळत होती. मला बघताच ती पळून गेली. मी तसाच उभा राहिलो.

गलका शांत झाला म्हणूनच बहुधा आतून वंदना बाहेर आली असावी.

मला पाहताच तिचे डोळे भरून आले. पण तिने हुंदका दाबला.

“वंदना, तुझ सांत्वन करायला माझ्याकडे शब्द नाही.” मी म्हटलं.

वंदनाने डोळे कोरडे केले.

“मला सांत्वनाचे शब्द नकोयत. ते ऐकून आत्तापर्यंत माझे कान किटलेत.” ती म्हणाली, “मला कुणाकडे मनातले विचार बोलून टाकायचे आहेत. मन मोकळ करायचं आहे. तुला मी सगळ सांगू शकते कारण तू नातेवाईकांसारखाच ह्या घरातल्या प्रत्येक व्यक्तीला ओळखतोस तरीही तू एका दृष्टीने परकाच आहे.”

“तुला वाटतं ते मोकळेपणाने बोल. मी ते योग्य का अयोग्य हा न्याय करणार नाही. तुझा भार कमी होईल याचेच मला समाधान लाभेल.” मी म्हटलं.

“माझ्या आयुष्याचे फासेच उलटे पडले. त्याबद्दल मी कुणालाही दोष देऊ शकत नाही. चूक माझीच आहे. सगळे नको नको म्हणत असताना मी हट्टाने अनेक वर्ष थांबून त्यांचाशी लग्न केलं. तेंव्हा मला वाटत होत की राजश्री व भाग्यश्री यांची लग्न झाली व शंतनूच बस्तान बसलं की संपली यांची जबाबदारी, महामूर्ख होते मी. मला हे कळत नाही की यांच्या मानेवरचे हे जू कधीच उतरणार नव्हते. त्याला कारण ते स्वतःच.”

“म्हणजे ?” मी विचारले.

“सांगते.” वंदना क्षणभर थांबली.” राजश्रीचं लग्न झालं. तिला लग्नात दागदागिने, जमीन सर्व काही दिलं तरी गेली पाच वर्ष ती व तिचे यजमान इस्टेटीत हिस्सा मागत आहेत. भाग्यश्री पैसे मागत नाही परंतु आपलं लग्न लवकर केल्याबद्दल तिने भावाला कधीच क्षमा केली नाही. शंतनु तर त्याला अनेक रित्या नावे ठेवतो. वडिलोपार्जीत इस्टेट उधळली म्हणतो. बहिणींना फार हुंडा दिला असं सांगतो. सगळे आईचे व आजीचे दागिने मलाच मिळाले असही म्हणतो. खर तर ते सर्व दागिने “घालायला द्या ना” म्हणून एक एक असं करून गेल्या दोन वर्षात उत्तरेने काढून घेतले व तिने ते परतच दिले नाहीत. माझ्याकडे फारच थोडे दागिने उरलेत. सांगितल तर हे म्हणायचे, “जाऊ दे ग, तो माझा धाकटा भाऊ आहे. त्याला सांभाळीन असं मी आजोबांना वचन दिलय.” अलका होईपर्यंत मी पैशाची एवढी काळजी केली नाही पण आता मात्र मी ते दागिने हातचे जाऊ दिले याचं वाईट वाटतय.”

“शंतनु पण अगदी नालायक निघाला. बंगला बळकावून बसला.” मी म्हणालो.

“त्याने फारच काही बिघडल नाही.” वंदना म्हणाली.” तो बंगला हे शंतनूलाच देणार होते.”

“ह्या वाड्यात जागा भाड्याने दिल्यात. त्या भाड्याचं काय होतं ?” मी विचारल.

“ते बहुतेक पैसे कर्जफेडीला जातात. कर्ज फिटेल तेव्हा ते शंतनू व आम्ही यांच्यात वाटले जातील. पण त्याला अजून खूप वर्ष आहेत.”

“मला कशाला बोलावलं होतं जयंताने हार्ट अ‍ॅटॅक आल्यावर ?” मी विचारल.

“तुम्हाला माझ्यासह ट्रस्टी नेमणार होते गणेशोत्सवाचा.”

“म्हणजे ?”

“म्हणजे नाईकांच्या वाड्यात सतत गणेशोत्सव चालू रहावा अशी आजेसासूबाईंची इच्छा होती. त्यासाठी ह्यांनी वेगळे पैसे काढून ठेवलेत. त्या पैशाचा व उत्सवसमितीचा तुमच्या वडिलांना व तुम्हाला प्रमुख ट्रस्टी करणार होते ते. मी व त्यांचा आणखी एक चुलत भाऊ असे दोन उपट्रस्टीही नेमणार होते. पण ते सगळच राहिलं.”

“ते पैसे तू घेऊन टाक आता अलकेसाठी.” मी सांगितलं.

“गणेशोत्सवापेक्षा महत्वाची अलका आहे.”

“ह्या क्षणी मला काहीच निर्णय घ्यायचा नाहीय. सध्या तर ते पैसे माझ्याच हातात आहेत. मला माझ्या शाळेची उपमुख्याधिपिका नेमणार आहेत बहुतेक. ती बढती मिळाली तर माझा पगार वाढेल. मला शक्य झाले तर मी ह्यांच्या इच्छेनुसार ट्रस्टची स्थापना करू शकेन.”

“भावनेच्या भरी पडून काही करू नकोस वंदना. तुझ्या पदरी मुलगी आणि सासू आहे हे विसरू नकोस” मी वंदनाला सांगितल.

“मला भेटायला आलात. तुम्हाला मनातलं बरच काही सांगितलं. आता मोकळ मोकळ वाटतय.”

“हो स्वतः त्याग करायचा आणि बरोबर स्वतःच्या माणसांना त्याग करायला लावायचा.” ती म्हणाली.

“वंदना, जयंतावर रागावू नकोस. क्षमा कर त्याला.” मी म्हटलं.

“जाणूनबुजून उडी घेतली तर रागवता येतं का आगीवर ?” वंदनेने विचारलं.

मी घरी जायला उठलो.

जाण्यापूर्वी डायबिटीसने व जयंताच्या मृत्यूच्या दुःखाने बिछान्याला खिळलेल्या मामींना भेटून आलो. त्यांना नमस्कार करून सुचले ते सांत्वनपर शब्द बोलले आणि घरी परतलो.

आई व बाबांना त्या रात्री मी शंतनु व वंदना यांच्याशी झालेलं बोलणं सविस्तर सांगितल. आणि शेवटी मी म्हणालो, “आता जयंताची आई, पत्नी व मुलगी जवळ जवळ कफल्लक परिस्थितीतच आहेत.”

वडिलांनी मला आणखी एक बातमी दिली. “दोन वर्षांपूर्वी जयंताने माझे ऐकलं असतं तर वाड्याचे पैसे मिळू शकले असते नाईकांना. माझा एक मित्र वाडे विकत घेऊन त्यांच्या जागी फ्लॅटस् बांधतो. त्याला जयंताचा वाडा विकत घ्यायचा होता. त्याबद्दल तो जयंता व शंतनुला एक एक फ्लॅट देऊन वर दोन लाख रुपये देण्यास तयार होता. पण जयंताने स्पष्ट नकार दिला व वाड्याचे छोटे छोटे गाळे पाडून ते भाड्याने दिले. आता तो वाडा पाहून फ्लॅट बांधले तरी त्यात नफा होणार नाही कारण प्रत्येक बिऱ्हाडाला फ्लॅट द्यावा लागेल.”

“जयंताला आई हयात असताना वाडा पाडून फ्लॅट करणे शक्य नव्हते.”

का कोण जाणे, पण जयंताने तो वाडा पाडू दिला नाही ह्यात मला आनंदच झाला. बालपणातली बारा वर्ष मी ज्या वाड्यात खेळत काढली, त्या वाड्यावर माझं अत्यंत प्रेम होतं असा शोध मला त्या क्षणी लागला. त्या वाड्यातला तो मधला प्रशस्त चौक, त्यातलं पारिजातकाचं व बकुळीचं झाड, पाच पायऱ्या चढून गेल्यावर लागणारी प्रशस्त पडवी, त्यातला कडीपाटाचा झोपाळा, ही सर्व स्थावर जंगम इस्टेट माझ्या बाल्याची अविभाज्य घटक होती. माझ्या मनाने जर वाडा पाडल्याविषयी असा कौल दिला तर जयंताची काय कथा ?

मी बाबांना म्हणालो “बाबा, स्वार्थत्याग हा जयंताच्या आयुष्याचा स्थायीभाव होता. त्याच्या त्यागाच्या होळीत त्याने स्वतःच्या पत्नीचाही बळी घायला मागेपुढे पाहिल नाही.”

बाबा गंभीर हसले आणि म्हणाले, “मी सॉमरसेट मॉमची ‘रेझरस् एज’ ही कादंबरी वाचतोय. त्यात त्यांनी बायबलच्या न्यू टेस्टमेंटमधली एक गोष्ट थोडी बदलून सांगितलीय. ती इथे हुबेहुब लागू पडते.”

“मग सांगा.” मी व आईने एकदमच म्हटले.

बाबा म्हणाले, “फक्त मतितार्थ सांगतो. जिझस खाईस्टने आपला भक्त व्हावं अशी सैतानाची इच्छा होती. म्हणून त्याने जिझसला मोहात पाडायचे प्रयत्न केले. ते सर्व फसल्यावर सैतानाने त्याला उंच पर्वतावर नेऊन जगातली समृद्ध राज्य दाखवली व म्हटलं, “तू माझी पूजा करशील तर तर ह्या सर्व राज्यांचा मी तुला सम्राट करीन” पण जिझस बधला नाही.

इथे मॅथ्यू ह्या सेंटची कथा संपते. पण मॉमने त्या कथेला वेगळा शेवट दिलाय.

मॉमच्या सांगण्याप्रमाणे सैतान एकदा परत आला व म्हणाला, “तुझ्या नशिबी मी हाल अपेष्टा व सुळावरती मृत्यू लिहितो. ह्या विधिलिखिताचा तू स्विकार केलास तर तू माणूसजातीचा रक्षणकर्ता समजला जाशील.”

ह्या मोहाला जिझस बळी पडला व त्याने सैतानाला होकार दिला.

सैतानाला हर्षवायू झाला. कारण त्याला भविष्यात जिझसने स्थांपलेल्या धर्माच्या नावाखाली माणूसजात किती दुष्कृत्य करेल हे माहीत होत.

“ह्या गोष्टीचा आणि जयंताचा काय संबंध ?” मी विचारलं.

“ह्या गोष्टीचा अर्थ मॉम यांच्या मते असा की स्वार्थत्याग ह्या मनोव्याधीची पकड माणसाच्या मनावर बसली की त्या मनोव्याधीतून माणसाला मुक्त होता येत नाही. प्रेम, भूक, सूड, वात्सल्य, कामुक लालसा ह्या सर्व भावनांची तीव्रता स्वार्थत्यागाच्या नशेपुढे तुच्छ ठरते. स्वार्थत्यागाचे कारण काही असो, स्वार्थत्यागाच्या धुंदीत असलेला माणूस स्वतःहून कुटुंबाची स्वार्थत्यागाच्या कुंडात होळी करण्यास तयार होतो.”

माझे वडिल इतक लांबलचक भाषण क्वचितच करत असत.

“थोडक्यात सैतानानेच जयंताच्या आजोबांच्या तोंडून जयंताकडून वचने घेतली.” मी म्हटलं.

“तेवढच नव्हे तर सैतानानेच ती जयंताला पाळायला लावली.” बाबा म्हणाले.

“मी गोष्टीत एवढा गुंतलो की आईच्या चेहेऱ्यावरचे फेरबदल माझ्या व बहुतेक बाबांच्याही लक्षात आले नाहीत.

आई एकदम उसळली. आईला इतकी रागावलेली मी कधीच पहिले नव्हते. ती वडिलांना म्हणाली. “जयंताचे आजोबा देवमाणूस होते. त्यांच्या अंगी मरताना सैतान संचारला होता असं सांगताय तुम्ही स्वतःच्या मुलाला ? आणि वर म्हणताय मृत्युशय्येवर दिलेली वचन सैतानानेच जयंताला पाळायला लावली. तुम्हाला म्हातारचळ लागलेला दिसतोय का तुमच्याच अंगात सैतान संचारलाय ? भलतसलतं शिकवताय माझ्या मुलाला ?”

मी व बाबा कधीही न रागावणाऱ्या संतप्त आईकडे बघतच राहिलो.

बाबांच्या गोष्टीने माझा फार गोंधळ झाला होता.

मी दुसऱ्या दिवशी संध्याकाळी आईबरोबर बाजारात जाऊन अलकेसाठी दोन फ्रॉक आणले व ते वंदनेकडे सोपवायचं काम आईवर सोपवून मी माझ्या नोकरीच्या गावी परतलो.

एकाच वर्षाने जयंताच्या आईच्या मृत्यूची वार्ता आली. वंदना व अलका आता वाड्यात एकट्याच रहात होत्या.

आणखी दोन वर्ष गेली.

एक दिवस मला वंदनाचे पत्र आले.

“तुमचा सल्ला मागायला हे पत्र लिहित आहे.”

“माझ्या शाळेत एक विधुर शिक्षक आहेत. त्यांना दोन मुलगे आहेत. त्यांची पत्नी कॅन्सरने वारली. त्यांनी मला मागणी घातली आहे.”

“सासूबाई वारण्याआधी त्यांना सारखी माझी व माझ्यापेक्षा अलकेची काळजी लागली होती. माझी आई माझ्या पुनर्विवाहाचा विचार करत आहे अशी कुणकुण त्यांच्या कानावरती आलेली होती. म्हणूनच बहुधा त्यांनी मी अविवहीत राहून अलकेला सांभाळीन असं वाचन माझ्याकडून घेतले आहे.

श्री पाठक म्हणतात, “आपण लग्न केलं तर माझ्या मुलांना आई मिळेल. तुझ्या मुलीला वडील मिळतील.”

माझं वय अडतीस आहे. अलका पाच वर्षांची आहे. मला पैशांची तशी अडचण नाही. आम्हा दोघींपुरतं मी कमावते. पण हा एकटेपणा मला खायला उठतो. जयंताच्या स्मृती मला पुरत नाहीत.

तरीही सासूबाईंना हे वचन मी देऊन बसलेय. काय करावं समजत नाही.

पत्राचे उत्तर लवकर लिहावे.”

थोडक्यात सैतान अमर होता.

मी उलट टपाली पत्र पाठवलं.

“जयंताने केलेली चूक तू करू नकोस. ताबडतोब श्री पाठकांच्या मागणीचा स्वीकार कर. लग्नाला मी येतोच.”

वंदनेच्या रजिस्टर विवाहाला अगदी जवळचे नातेवाईक उपस्थित होते.

आई आसपास नाही असं बघून लग्नानंतर घरी परतताना मी बाबांकडे दृष्टीक्षेप टाकला आणि म्हणालो “या वेळी तरी सैतान हरला.”

बाबा नुसतेच हसले.

पूर्वप्रसिद्धी नीहार दिवाळी अंक १९९१